# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि ०५/१०/२०२३

घरफोडी :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र १२२२/२३ कलम ३८०,४५७,३८० भादवि | चिलम छावणी अमरावती | दि २५-०९-२३ चे १५-३० वा ते दि ३०-०९-२३ चे २२-४५ वा दरम्यान<br>दि ०५-१०-२३ चे ०१-२३ वा | फाजी असी हैदर अली वय ४८ वर्षे रा चिलम छावणी अमरावती | अज्ञात इसम | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि हे परीवारासह घराला कुलुप लावुन अकोला गेले व परत चिलम छावणी येथील घरी परत आले असता घराचे मागील साईडचे वॉश एरिया मधील सामान इंडेण गॅस कंपनिचे सिलेडर कि अं १०००/-रु दिसुन आले नाही कोणीतरी अज्ञात व्यक्तीने घराच्या जिन्यावरुन वॉश रुम परीसरात प्रवेश करुन सिलेंडरची चोरी केली अश्य फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

चोरी :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अम. शहर | अमरावती | दि. ०४/१० /२०२३ चे १५. ०० वा | एक महिला | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि फिर्यादीने बक–या घरासमोर परीसरात चरतात व मोकाट फिरतात सांयकांळी त्यांनी त्यांना आम्ही घरी घेवुन येतो व घराच्या आवारात बांधुन ठेवतो नमुद घटना. ठिकाणी फिर्यादीने बक–या चराला मोकाट सोडुन दिल्या असता त्यातील दोन बोकुड व ३ बक–या घरी आल्या १२ महीण्याची एक वाठ पांढ–या रंगाची वनज अंदाजे ७ किलो कि.अं ३०००/रू घरी परत आली नाही नंजर मी तिचा शोध घेतला असता माझया मोहल्यात राहणारी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अप क्र ८१३/ २०२३ कलम ३७९ भादवी | | दा.ता.वेळ — दि. ०५/१० /२०२३ चे ००. २८ वा | | | महीला हि फिर्यादीला भेटली व तिने मला सांगितले कि माझी २. २ वर्श ची पुर्ण पांढ—या रंगाची गाभन बकरी कि.अं ९०००/ हि बकरी सुध्दा परत आली नाही तेव्ही फिर्यादीच्या मोहल्यात राहणारी महीला ही सुध्दा आली तिने सांगीतले कि तिचे घरातील बोकुड ज्याचे वर्णन ७ महीन्याचा बोकुड लाल पांढ—या रंगाचा ज्याची कि.अं.४०००/रू हि सुध्दा अजुन पर्यंत घरी आली नाही आजुबाजुला मोहल्यात शोध घेतला मिळुन आल्या नाही कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्या आहे अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| **१** | **पोस्टे राजापेठ अप क्रं. ८८१/२३ कलम ३८० भादवी** | **अमरावती** | **दि. १६/०९/२३ चे ०७/४५ वा. ते ०८/१५ वा. दरम्यान**<br><br>**दा. ता. वेळ ०५/१०/२३ चे ०० -२२ वा** | **एक महिला** | **अज्ञात** | **गुन्हाची थोडक्यात हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घ ता वेळी व ठिकणी फिर्यादी हे किचन मध्ये स्वयंपाक करत असतांना त्याचा मोबाईल हॉलमध्ये चार्जीग करीता लावला होता. फिर्यादीचे पती नांदगाव पेठ येथे MIDC येथे नोकरीवर असल्याने त्यांच्या कंपनीची बस हि साईनगर चौकात येत असल्याने त्यांना सोडण्याकरीता जात असतांना हॉलमध्ये चार्जीगला लावलेला Vivo Y30 कंपनीचा मोबाईल दिसुन आला नाही हॉलमध्ये शोध घेतला मिळुन आला नाही. किचन मध्ये स्वयंपाक करत असतांना हॉलचा दरवाजा उघडा पाहुन कोणीतरी अज्ञात चोराने घराचे आतमध्ये प्रवेश करून चोरुन नेला. अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल** |

विनयभंग :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र.७१८/२०२३ कलम ३५४(ड) भा.दं.वि. सहकलम १२ पोक्सो | अमरावती | घटना ता.वेळ - दि.०५.१०.२०२३ चे ००.३० वा. दाखल ता.वेळ - दि.०५.१०.२०२३ चे ०३.४५वा. | पिडीत मुलीचे वडील | विशाल रामभाऊ राऊत वय २१ वर्ष रा बार्शीटाकळी जि अकोला ह मु. पथ्रोट ता अचलपुर जि अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व तिची अल्पवयीन मुलगी हे जेवन करायला गेले असता तेथे यातील आरोपी हा त्याच्या मोटार सायकलने येवुन जवळीक साधण्याच्या उद्देशाने तिच्या मुलीकडे बघु लागला तेव्हा फिर्यादी याने त्यास हटकले अशता तो तेथुन पळुन गेला तेव्हा गावातील लोकांनी त्याचा पाठलाग केला तर तो काही अंतरावर येवुन खाली पडला फि ने तु येथे काय करत आहे याबाबत विचारना केली असता त्याने फि चे मुलीला भेटण्यास आल्याचे सांगीतले त्यानंतर गावातील लोकांना पोलीसांना बोलावुन त्याचे ताब्यात देण्यात आले नंतर फि हे पो स्टे ला तक्रार देण्यास आले असता दि. ४/१०/२३ ते दि. ५/१०/२३ चे मध्यरात्री यातील आरोपी हा फि ची अल्पवयीन मुलीसोबत जवळीक साधण्याच्या उद्देशाने तिचा पाठलाग करित फि चे गावात आला व त्याव्दारे त्याने तिचे मुलीचा विनयभंग केला |
| २ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र १२२१/२३ कलम ३५४,५०९ भादवि | अमरावती | दि ०४-१०-२३ चे १२-१५ वा दरम्यान<br>दि ०५-१०-२३ चे ००-५३ वा | एक महिला | NCC ऑफीस अमरावती | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि ह्या NCC ऑफीस ला गेल्या असता आरोपीने फि ला म्हटले कि तु माझ्या जवळ ये त्यामुळे फिर्यादीला लज्जा निर्माण झाली अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

अपघात :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८८२/२३ कलम २७९,३३७,३२३, ५०४,५०६ भादवी | गोपाल नगर रोड अमरावती | दि. ०४/१०/२३ चे २१-०० वा. दरम्यान<br><br>दा. ता. वेळ ०५/१०/२३ चे ०१-१० वा. | गोलु संतोष पटेल वय २१ वर्ष रा. पाचबंगला बडनेरा अमरावती | TVS ज्युपीटर गाडी क्र. MH २७ CQ ०७६४ चा चालक मनिष बाळु पाडर | गुन्हाची थोडक्यात हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घ ता वेळी व ठिकणी फिर्यादी हे त्याचा मित्र नाजीम याची गाडी क्र. MH २७ N ४७७१ ने नाजीम याला चपराशीपुरा चौक येथे सोडण्याकरीता गोपाल नगर येथुन जात असतांना समोरून येणा-या TVS ज्युपीटर गाडी क्र. MH २७ CQ ०७६४ चा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन अतिशय वेगाने व निष्काळजीपणाणे चालवुन समोरून धडक दिली. त्यामुळे फिर्यादी व त्याचा मित्र नाजीम खाली पडले व फिर्यादीचे उजव्या पायाला हाताला मार लागला. फिर्यादीने आरोपीस गाडी व्यवस्थित चालवता येत नाही का असे म्हटले असता आरोपीने थापड,बुक्यांनी मारहान केली व शिवीगाळ करून जास्त बोलशील तर आणखी मारेल अशी धमकी दिली. अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८८३/२३ कलम २७९,३३७,३२३, ५०४,५०६ भादवी | गोपाल नगर रोड अमरावती | दि. ०४/१०/२३ चे २१-०० वा. दरम्यान<br><br>दा. ता. वेळ ०५/१०/२३ चे ०१-३१ वा. | मनिष बाळु पाडर वय ३० वर्ष रा. जनता कॉलनी गोपाल नगर अमरावती | पॅशन प्रो गाडी क्र. MH २७ N ४७७१ चा चालक गोलु संतोष पटेल | गुन्हाची थोडक्यात हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घ ता वेळी व ठिकणी फिर्यादी हे TVS ज्युपीटर गाडी क्र. MH २७ CQ ०७६४ ने गोपाल नगर येथुन मार्केट मध्ये जात असतांना समोरून येणा-या पॅशन प्रो गाडी क्र. MH २७ N ४७७१ चा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाणे चालवुन फिर्यादीच्या गाडीला जोरदार धडक दिली. त्यामुळे फिर्यादी खाली पडल्याने गाडीचे फायबर तुटले . फिर्यादीने आरोपीस गाडी व्यवस्थित चालवता येत नाही का असे म्हटले असता आरोपीने काही न एकता वाद करून तु पहिले गाडी व्यवस्थित चालव असे म्हणुन थापडाबुक्यांनी मारहान केली व शिवीगाळ करून तु बाहर भेट अशी धमकी दिली. अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | कोतवाली अप क्र | पाणपोई जवळ | घटना ता वेळी | कय्युम शहा लतीफ शहा वय ४५ व्यवसाय शेती रा | ऑटोचा क्र एम एच २७-अे एफ - २०६५ चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की जबानि रिर्पोट सिटी कोतवाली दि ०५/१०.२३ रोजी मी समक्ष विचारल्यावरुन सांगतो की वर नमुद पत्यावर राहतो व शेतीचे काम करतो आज दि ०५/१०/२०२३ रोजी सकाळी ०८.४५ वा दरम्यान ईर्वीन दवाखान येथे असलेली पाणपोई चे बाजुला फुटपाथवर मी बसाले होतो तेवढयात एक ऑटो |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ४३८/२०२३ कलम २७९,३३७ भादवि | इर्विण चौक अमरावती | दिनांक ०५/१०/२०२३ चे ०८.४५ वा दरम्यान दाखल वेळ दिनांक ०५/१०/२०२३ चे १२.०८ वा | कसबेगव्हाण ता अंजनगाव सुर्जी जि अमरावती | | भरधाव वेगाने आला व मी खाली बसलो असता त्याने मला ठोस मारुन जखमी करणा-या ऑटोचा क्र एम एच २७-अे एफ -२०६५ काळया रंगाचा प्रवासी ऑटो आहे मला जखम झल्यावर तेथील लोकांनी मला ईर्वीन दवाखाना येथे आणले व माझे वर वॉर्ड क्र ३० मध्ये उपचार सुरु आहे मला त्या ऑटौ चालकाचे नाव माहीत नाही ठोस लागल्यामुळे ऑटो चा चालकाला सुध्दा मार लागला आहे मला त्या ऑटो चालकाविरुध्द कायदेशीर कारवाई करीता बयाण देत आहे हेच माझे बयाण आहे माझे सांगण्यावरुन लिहीला वाचुन दाखविला बरोबर आहे अशा फिर्यादीचे जाबानि रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टी वरुन डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

इतर :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८८०/२३ कलम ३८४,३७९,३२३, ५०६,३४ भादवी | अमरावती | दि. ०४/१०/२३ चे पुर्वी<br><br>दा. ता. वेळ ०५/१०/२३ चे ००-०७ वा. | ओंकार तुळशीराम बिटने वय ५२ वर्ष रा. रा. शिवनगर कठोरा रोड अमरावती | १- एक महिला व तिचा मुलगा<br>२) एक महिला<br>रा. अमरावती | गुन्हाची थोडक्यात हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील फिर्यादीची आरोपीसोबत ओळख मागील एक वर्षापुर्वी झाली होती. त्यानंतर आरोपी व फिर्यादी हे एकमेकांना भेटत होते. आरोपी हि फिर्यादी यांचे कार्यालयात येत होती. यातील आरोपीने वेळोवेळी फिर्यादीला पैशाची मागणी केली दिले नाहीतर पोलीस स्टेशनला जावुन तक्रार देतो अशी धमकी दिली. यापुर्वी फिर्यादीने आरोपी क्र. १ हिला पाच लाख रूपये तसेच वेळोवेळी एकुण १२ लाख ६०,००० रू दिले होते. तसेच नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपीने पुन्हा दोन लाख रूपयाची मागणी केली होती. नाहीतर पोलीस स्टेशनला जावुन तक्रार देतो अशी धमकी दिली. फिर्यादीला ते द्यायचे नसल्याने व टाळण्याकरीता फिर्यादीने आरोपी हिला दोन लाख घे व स्टॅम्पवर सही करून दे, यानंतर मला ब्लॅकमेलिंग करू नको. असे म्हटले असता व घटनास्थळी गेला असता आरोपीने सदर स्टॅम्प पेपर फाडुन तसेच डिक्कीतील रक्कम दोन लाख रूपये वॉलेटसह नगदी ९५०० असे एकुन २,०९५०० रू. , एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, असे महत्वाचे कागदपत्र घेवुन निघुन गेली. अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |